अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. २५ सप्टेंबर २०२२ ▸ वर्ष : २० वे ▸ अंक : ३५६ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८




## मुंबईचे माजी पोलीस आयुक्त संजय पांडेंना ४ दिवसांची कोठडी

✔ **मुंबई** : मुंबईचे माजी पोलीस आयुक्त संजय पांडे यांच्या अडचणीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. नॅशनल स्टॉक एक्सचेंज फोन टॅपिंग प्रकरणी सीबीआयने मुंबईचे माजी पोलीस आयुक्त संजय पांडे यांना अटक केली आहे. मागील काही दिवसांपासून संजय पांडे हे न्यायालयीन कोठडीत होते. नॅशनल स्टॉक एक्सचेंज फोन टॅपिंग प्रकरणी त्यांना ईडीने अटक केली होती. परंतु आज त्यांना दिल्ली न्यायालयात हजर केले असता दिल्ली न्यायालयाने संजय पांडेंना ४ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे. एनएसईचे माजी सीईओ रवी नारायण हे देखील ईडीच्या ताब्यात आहेत. एनएसई घोटाळ्याशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरण आणि एक्सचेंज कर्मचाऱ्यांचे फोन बेकायदेशीर टॅप केल्याप्रकरणी त्यांना ताब्यात घेण्यात आले होते. ईडीने १४ जुलै रोजी नारायण, चित्रा रामकृष्ण आणि पांडे यांच्या विरोधात पीएमएल अंतर्गत गुन्हा दाखल केला

# विघातक शक्तीने अस्मितेला मारला डंख, 'पीएफआय'चे वेळीच छाटावे लागतील पंख



✔ सुराज्य/सोलापूर

**आपल्याच देशात राहून भारत मातेच्या अस्मितेला डंख मारणाऱ्या एका नव्या विघातक संघटनेचा उदय झाला आहे. पॉप्यूलर फ्रंट ऑफ इंडिया अर्थात पीएफआय असे या संघटनेचे नाव. पीएफआयचा हेतू अतिशय धोकादायक आहे. सामाजिक कार्य करण्याच्या नावाखाली परदेशातून निधी गोळा करणे आणि दहशतवादी मॉड्यूल तयार करणे, भारताविरुद्ध प्रचार करणे, शाळा-कॉलेजमधून नव्या तरुणांची भरती करणे, मुलांचे ब्रेनवॉश करणे, तरुणांना दहशतवादी कारवायांचे प्रशिक्षण देणे, दगड फेकण्याचे प्रशिक्षण देणे, शांततेत सुरू असलेल्या मोर्चाला हिंसक करणे, अशी कामे केली आहेत,असा तपास यंत्रणेचा निष्कर्ष आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणा अर्थात एनआयएने केलेल्या कारवाईच्या विरोधात शुक्रवारी पुण्यात झालेल्या आंदोलनाच्या वेळी पीएफआयच्या कार्यकर्त्यांनी चक्क 'पाकिस्तान जिंदाबाद' 'नारे ए तकबीर'ची घोषणाबाजी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अशा शक्तीचे पंख वेळीच छाटण्याची संतप्त भावना सर्वत्र व्यक्त केली जातेय.**


## पुण्यात पाकिस्तान जिंदाबादचा फुत्कार
## सरकार लवकरच कंबरडे मोडणार

### त्यांना सोडणार नाही



उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पीएफआयच्या समर्थकांना खणखणीत इशारा दिला आहे. ज्यांनी पाकिस्तान जिंदाबाद अशा घोषणा दिल्या त्यांना सोडणार नाही,असे ते म्हणाले. शनिवारी नागपूरमध्ये ते पत्रकारांशी बोलत होते. महाराष्ट्रात आणि भारतात कुणी पाकिस्तान जिंदाबादची घोषणा देणार असेल तर त्याला सोडणार नाही. त्याच्यावर कारवाई करू. ते जिथे असतील तिथून शोधून काढून कारवाई करू. यावेळी फडणवीसांनी एनआयएने केलेल्या कारवाईचे समर्थन केले. यासंदर्भातील मोठ्या प्रमाणात वेगवेगळे पुरावे एनआयएकडे, एटीएसकडे आणि केंद्र व राज्य सरकारकडे उपलब्ध आहेत. यापूर्वीही केरळसारख्या सरकारने पीएफआयवर बंदी टाकण्याची मागणी केली आहे. सध्या तपास सुरू आहे. त्यातून अनेक गोष्टी बाहेर येतील. पीएफआयच्या नव्या कार्यपद्धतीनुसार (मोडस ऑपरेंडी) देशात आतल्या आत अस्वस्थता निर्माण करण्याचे षडयंत्र आखले जात होते.

### त्यांना वेळीच ठेचा



पुण्यामध्ये 'पाकिस्तान जिंदाबाद' ची घोषणाबाजी करण्यात आल्याच्या मुद्द्यावरुन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी संताप व्यक्त केला आहे. माझी केंद्रातील, राज्यातील गृहमंत्र्यांना विनंती आहे की, 'पाकिस्तान झिंदाबाद,अशा घोषणा भारतात दिल्या जाणार असतील तर आता ह्या देशातील हिंदू बांधव गप्प बसणार नाहीत. त्यापेक्षा ही कीड समूळ नष्टच करा, ह्यातच भारताचे हित आहे, असे राज यांनी म्हटले आहे. ट्वीटरच्या माध्यमातून त्यांनी आपली भूमिका मांडली आहे. राज यांनी थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि राज्याचे गृहमंत्री तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना टॅग करत एक पोस्ट केली आहे.सरकारने यांना वेळीच ठेचले पाहिजे असे राज यांनी म्हटले आहे.

### सिमीचा पर्याय

पीएफआयला स्टुडेंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया अर्थात सिमीचा पर्याय मानले जाते. १९७७ साली स्थापन झालेल्या सिमीवर २००६ साली बंदी घालण्यात आली होती. त्यानंतर मुस्लिम, आदिवासी आणि दलितांच्या अधिकारासाठी या संघटनेची स्थापना आली होती. पण प्रत्यक्षात त्यांचे काम यापेक्षा वेगळे होते. एक कट्टर इस्लामिक संघटना ज्याचे नाव देशात झालेल्या अनेक दंगलीत समोर आले. संशयास्पद हालचालींमुळे यावर अनेकदा बंदी घालण्याची मागणी करण्यात आली.

गेल्या दोन दिवसात एनआयएने राज्यात छापेमारी करून पीएफआयच्या कार्यकर्त्यांची धरपकड केली आहे. शुक्रवारी सायंकाळी पुण्यातील या संघटनेच्या समुदायामधील काही व्यक्तींनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एनआयएने केलेल्या कारवाईविरोधात आंदोलन केले. त्यावेळी ही घोषणाबाजी करण्यात आली. पुणे पोलिसांनी अनेक आंदोलकांना ताब्यात घेतले. त्यामुळे हे आंदोलन बारगळले. राष्ट्रीय तपास यंत्रणेने देशातील १२ राज्यात पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियाच्या विविध ठिकाणी छापे टाकले. या छाप्यात १००हून अधिक जणांना अटक देखील करण्यात आली आहे. हे छापे दहशतवादी कारवायांसाठी करण्यात आलेल्या आर्थिक मदतीप्रकरणी असल्याचे समजते. अचानक झालेल्या या कारवाईमुळे अनेक प्रश्न समोर आले आहेत.

## पोलीस अधिकारी असल्याचे भासवून लाखाची फसवणूक

✔ सुराज्य/सोलापूर

पोलीस अधिकारी असल्याचे भासवून एक लाख रुपये घेऊन वृद्धाची फसवणूक केल्याची घटना दि.२३ सप्टेंबर रोजी आकांक्षा मोबाईल शॉपीच्या बाजूला छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे घडली. याप्रकरणी शिवबसप्पा मलकप्पा विजापुरे (वय-८२, रा.कुरनुर, ता.अक्कलकोट) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

विजापुरे हे तारण ठेवलेले सोने सोडविण्याकरिता वरील ठिकाणी एक लाख रुपये घेऊन जात असताना आकांक्षा मोबाईल शॉपीच्या बाजूला अज्ञात इसमाने मी पोलीस अधिकारी आहे. तुम्हाला कळत नाही का? तुम्ही तोंडाला मास्क लावला नाही का,दारू पिलात का, असे म्हणून त्यांच्या खिशामध्ये असलेले पैसे घेऊन पोबारा केला. तपास सहायक पोलीस निरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

## गाळप परवाना न घेता कारखाना सुरू केल्यास एमडीवर होणार गुन्हा दाखल करा

■ साखर आयुक्त शेखर गायकवाड यांचे आदेश

✔ सुराज्य/सोलापूर

पुणे विभागातील जे सहकारी व खाजगी साखर कारखानदार १५ ऑक्टोबर पूर्वी परवानगी न घेता साखर कारखाने सुरू करतील त्या कारखान्याच्या कार्यकारी संचालकावर तसेच जनरल मॅनेजर, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचा आदेश साखर आयुक्त शेखर गायकवाड यांनी पारित केला आहे.सन २०२२-२३ हा गळीत हंगाम सुरू झाला आहे. अनेक साखर कारखान्यांचा अग्नी प्रदीपन सोहळा थाटात पार पडला आहे.



कारखाना सुरू करताना व बंद करतानाही शासनाची परवानगी घेणे आता बंधनकारक केले आहे. मात्र अनेक सहकारी व खासगी साखर कारखानदार गाळप परवाना न घेता कारखाने सुरू करतात. १९ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्री समितीची बैठक संपन्न झाली, त्या बैठकीत वरील प्रमाणे निर्णय झाला आहे. त्या निर्णया संदर्भातील पत्र प्रत्येक साखर कारखान्यांना पाठवली आहेत. सहकारी साखर कारखान्यांचे कार्यकारी संचालक, खाजगी साखर कारखान्यांचे जनरल मॅनेजर, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे अधिकार त्या त्या जिल्ह्यातील पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षकांना देण्यात आले आहे. तो साखर कारखाना कुठल्या पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात आहे त्या त्या पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षका कडुन त्याची अंमलबजावणी होणार आहे.

## सोलापूरसह नगरच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी विखे-पाटलांकडे

### शिंदे-फडणवीस सरकारकडून पालकमंत्र्यांची घोषणा

✔ सुराज्य/सोलापूर

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे -उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारला पालकमंत्री नेमण्यास अखेर मुहूर्त मिळाला आहे. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे अहमदनगरसह सोलापूरची जबाबदारी देण्यात आली आहे. तर पुण्याचे पालकमंत्रीपद चंद्रकांत पाटील यांच्याकडे, तर फडणवीस हे नागपूरचे पालकमंत्री असतील.

बहुचर्चित औरंगाबादची जबाबदारी शिंदे गटाच्या संदीपान भूमरे यांच्याकडे देण्यात आली आहे. पालकमंत्री न नेमल्यामुळे विरोधी पक्षांकडून शिंदे-फडणवीस सरकारवर टीका करण्यात येत होती. पालकमंत्र्यांच्या ऐवजी यंदाच्या स्वातंत्र्यदिनी अधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले होते. त्यावरूनही विरोधकांनी सरकारवर निशाणा साधला होता. तब्बल दीड महिन्यानंतर पालकमंत्रीपदाचा तिढा सुटला असून जिल्हानिहाय पालकमंत्री निश्चित झाली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूर, वर्धा, अमरावती,अकोला, भंडारा, गडचिरोली या जिल्ह्याचे पालकमंत्री असतील. नियोजन मंत्री म्हणून त्यांच्याकडे या जिल्ह्यांची जबाबदारी असेल.



### जिल्हानिहाय पालकमंत्री

राधाकृष्ण विखे पाटील : नगर, सोलापूर, सुधीर मुनगंटीवार-चंद्रपूर, गोंदिया, चंद्रकांत दादा पाटील- पुणे, विजयकुमार गावित- नंदुरबार, गिरीश महाजन- धुळे, लातूर, नांदेड, गुलाबराव पाटील- बुलडाणा, दादा भुसे- नाशिक, संजय राठोड- यवतमाळ, वाशिम, सुरेश खाडे- सांगली संदिपान भुमरे -औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), उदय सामंत- रत्नागिरी, रायगड तानाजी सावंत- परभणी, उस्मानाबाद (धाराशिव), रवींद्र चव्हाण- पालघर, सिंधुदुर्ग अब्दुल सत्तार- हिंगोली, दीपक केसरकर -मुंबई शहर, कोल्हापूर, अतुल सावे- जालना, बीड, शंभूराज देसाई- सातारा, ठाणे, मंगलप्रभात लोढा -मुंबई उपनगर

## नवरात्रोत्सवात रात्री दहापर्यंत; नवमीला बारापर्यंत स्पीकरला परवानगी



✔ सुराज्य/सोलापूर

शहरात सण-उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरे होतात. सोमवारपासून नवरात्रोत्सवाला प्रारंभ होत आहे. २६ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर या काळात नवरात्रोत्सव साजरा होत आहे. ४ सप्टेंबरला नवमीनिमित्त स्पीकरला (ध्वनिक्षेपकास) सकाळी सहा ते रात्री १२ वाजेपर्यंत परवानगी असणार आहे.

कोरोनानंतर दोन वर्षांनी पहिल्यांदाच नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. उत्सव साजरा करण्यावर शासनाचे कोणतेही निर्बंध सध्या लागू नाहीत. ८ ऑक्टोबरला कोजागिरी पौर्णिमा आहे. नवरात्रोत्सव काळात स्पीकरसाठी सकाळी सहा ते रात्री दहा वाजेपर्यंतच परवानगी असणार आहे. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी स्पीकरसंदर्भात स्पष्टीकरण दिले. त्यानुसार पोलीस उपायुक्त डॉ. वैशाली कडूकर यांनी स्पीकरच्या वेळांबाबत नवे आदेश काढले आहेत. स्पीकर लावण्यासाठी परवानगी असेल, पण सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होणार नाही, याची नवरात्रोत्सव मंडळांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले.

■ **प्रतिष्ठापनेसाठी दोन हजार पोलिसांचा बंदोबस्त**


सोमवारी घटस्थापना होणार आहे. शांततेत व आनंदात नवरात्रोत्सव साजरा व्हावा या हेतूने शहरात तीन पोलिस उपायुक्त, पाच सहायक पोलिस आयुक्त, २४ पोलिस निरीक्षक, ५० सहाय्यक पोलिस निरीक्षक, एक हजार १६१ पोलिस अंमलदारांचा बंदोबस्त असणार आहे. शहर पोलिसांच्या मदतीला एसआरपीएफची एक कंपनी आणि सातशे पुरुष होमगार्ड व शंभर महिला होमगार्ड असणार आहेत.

## पंढरपूर पोलिसांकडून वाळू आणि ११ गाढवे जप्त

✔ **पंढरपूर** : भीमा नदीच्या पात्रातून गाढवाद्वारे वाळू चोरी करताना पोलिसांनी ३ हजार रुपये किमतीची वाळू आणि ११ गाढवे असा १ लाख १० हजाराचा माल जप्त केला. ही कारवाई पंढरपूर येथील दगडी पुलाजवळ शुक्रवारी सकाळच्या सुमारास करण्यात आली. या प्रकरणात पोलिसांनी गणेश सिद्राम (धोत्रे वय ४० रा.जुनी वडार गल्ली, पंढरपूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. शुक्रवारी सकाळी ७ च्या सुमारास गणेश धोत्रे हा ११ गाढवावरून नदीतील वाळू चोरी करून निघाला होता. त्याला पकडून अर्धा ब्रास वाळू (किंमत ३ हजार रुपये) आणि गाढवे जप्त करण्यात आले. अशा आशयाची फिर्याद पो.शिपाई समाधान माने यांनी पंढरपूर शहर पोलिसात दाखल केली. पुढील तपास हवालदार मुजावर हे करीत आहेत .

## तिसरा डोळा


– प्रकाश पोरे



आपल्याकडे हेलिपॅड होणार असं कोणी तरी म्हणालं!

कल्याण
135-99-469

## भजन आणि कीर्तन बंदीचे प्रकरण चिघळले, गोपनीय अहवाल फोडल्यामुळे विठ्ठल मंदिराला धोका?



✔ सुराज्य/पंढरपूर

येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात गुप्तचर विभागाचा संदर्भ देत वारकऱ्यांना भजन आणि कीर्तन करण्यासाठी बंदी घातल्याचा निर्णय घेतला होता. गुप्तचर विभागाचा संदर्भ दिल्यामुळे हे प्रकरण अधिक चिघळले आहे. गोपनीय अहवालातील सुरक्षेसाठी सुचवलेल्या बाबी उघड झाल्यामुळे या सर्व गोष्टींचा फायदा काही विघातक शक्ती घेण्याची शकता नाकारता येत नाही.

विनोद जाधव महाराजांचा सप्ताह श्री विठ्ठल मंदिराच्या लाकडी सभामंडपात रीतसर परवानगी घेऊन केला जात असतो. यंदाही १६ सप्टेंबरपासून सप्ताह सुरू झाला मात्र १८ सप्टेंबर रोजी सकाळी श्री विठ्ठल नामजम सुरू असताना मंदिर समितीच्या कर्मचाऱ्याच्या फोन वरून मंदिरातील कार्यक्रम करण्यास मनाई करण्यात आली आहे, तसा वरून आदेश आला आहे असे सांगत तुमचा स्टेज, नामजप करणारी मंडळी घेऊन जावा असे सांगण्यात आले होते.

भजन कीर्तन करण्यास बंदी घातल्याचा प्रकारावर विविध वारकरी संप्रदायातील महाराज मंडळी, विविध संघटनांनी विरोध केल्यामुळे प्रशासनावर दबाव निर्माण झाल्यानंतर कार्यकारी अधिकारी गजानन गुरव यांनी गुप्तचर विभागाचा दाखल देत केवळ स्पीकरला बंदी घातली आहे. भजन आणि किर्तनसाठी बंदी नसल्याचे सांगितले. मात्र, भजन कीर्तनासाठी बंदी नाही हे सांगत असताना कार्यकारी अधिकारी गजानन गुरव यांनी गुप्तचर विभागाचा संदर्भ देऊन मोठी खळबळ उडाली होती.

विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे प्रत्येकवर्षी गृहविभाग सिक्युरिटी ऑडिट करत असते. मंदिराच्या सुरक्षतेसाठी गोपनीय सूचना करत असते. भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले जाते. मात्र त्यांच्या सूचनांची अंमलबजावणी किती होते हा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. कार्यकारी अधिकारी गजानन गुरव यांच्या वक्तव्यामुळे संपूर्ण सुरक्षा यंत्रणेवर ताण पडत आहे.

### अहवाल समितीपुढे सादर झाला नाही : ॲड. निगडे

गोपनीय अहवाल हा गोपनीय राहायला पाहिजे होता. कारण तो मंदिर समितीला सुद्धा माहीत नाही. मी मंदिर समितीची सदस्या आहे. हा अहवाल समितीपुढे सादर झाला नाही. सुरक्षतेबाबतच्या अहवालातील काही बाबी बाहेर आल्या असतील तर नक्कीच विठ्ठल रुक्मिणी मंदिराला धोका होऊ शकतो. तसेच मंदिर समिती सदर अधिकारी यांना विचारणा करून योग्य ती कारवाई करेल, असे मंदिर समितीच्या सदस्या ॲड. माधवी निगडे यांनी सांगितले.

### अहवाल सार्वजनिकरित्या जाहीर केला जात नाही : कदम

गुप्तवार्ता विभागामार्फत वेळोवेळी मंदिर सुरक्षे बाबतचा घेतला जातो. त्यांच्याकडून सुरक्षिततेबाबत अहवाल देण्यात येतो. हा अहवाल हा गोपनीय स्वरूपाचा असतो व तो मंदिर सुरक्षतेबाबतचा असल्याने सार्वजनिकरीत्या जाहीर केला जात नाही. मात्र मंदिर सुरक्षा बाबतची कोणतीही गोष्ट अत्यंत गांभीर्याने बघितली जाते, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी सांगितले.